पोलीस स्टेशन, धानोरा
सत्यमेव जयते
जि. गडचिरोली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** धानोरा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0068 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/08/2024 21:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 19/06/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/08/2024
**Time From (वेळेपासून):** 17:38 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:11 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/08/2024 **Time (वेळ):** 15:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 029
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/08/2024 21:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समीती धानोरा येथील, मिटींग हल समोर,धानोरा, 442606

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with OKEN Scanner

पोलीस स्टेशन, धानोरा जि. गडचिरोली

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. नितीन विष्णु देवीकर

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** विष्णु देवीकर

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | साहारे पोलीस यांचे घरी किरा, कम्पलेक्स गडचिरोली, गडचिरोली, गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,442605,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | साहारे पोलीस यांचे घरी किरा, कम्पलेक्स गडचिरोली, गडचिरोली, गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,442605,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** ठेकेदार

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9422494232

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.अक्षय मनोहर अगळे | | वडील का नाम : मनोहर अगळे | 1. जिल्हा परिशद बांधकाम ,उप विभाग धानोरा,धानोरा,धानोरा , गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-442606 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

लेखी

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | 1सन्डीक्स कंपनीचे 32 जिबी मेमोरी कार्ड 03 नग | 0.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | ॲपल कंपनीचे आयफोन 11मडलचे मोबाईल | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पोलीस स्टेशन धानोरा

दिनांक

01/08/2024

नाव:- श्री. नितीन विष्णु देवीकर, वय 33 वर्षे, धंदा-ठेकेदार हल्ली मु. श्री. साहारे पोलीस यांचे घरी किरायाने नंदनवन
नगर कॉम्पलेक्स गडचिरोली ता. जि. गडचिरोली मुळ पत्ता- रा. कुरखेडा ता. कुरखेडा जि. गडचिरोली
मो.नं. 9422494232

मी दिनांक 19/06/2024 रोजी श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांना एका लोकसेवकाविरुद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे श्री श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांना सहीनिशी माझी लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.

सन 2023-2024 मधील जिल्हा परिशद गडचिरोली अंतर्गत सब डीव्हीजन धानोरा येथील 1. रेंगेगांव-गोटाटोला रस्त्याचे सुधारणा करणे, 2. मुरूमगांव-रिडवाही रस्त्याची सुधारणा करण्याचे बांधकाम माझे नावे आहे. तसेच 3. दंडकारण्य मजुर सहकारी संस्था मर्या. गटटा ता. धानोरा जि. गडचिरोली यांचे तोंडी सांगणे वरून मौजा बोधनखेडा पोच मार्गाची सुधारणा करण्याचे कामावर मटेरीयल पुरवठा व देखरेख ठेवण्याचे काम तसेच 4.प्रभुकमल मजुर सहकारी संस्था मर्या. मु.पो. दुधमाळा ता. धानोरा जि. गडचिरोली यांचे तोंडी संगणे वरून मौजा तुमडीकसा हिरंगे रस्त्याची सुधारणा करण्याचे कामावर मटेरीयल पुरवठा व देखरेख ठेवण्याचे काम मी पाहत होतो. असे एकुण अंदाजे 40 लाख रूपयाचे कामे कंत्राटी पध्दतीने पुर्ण केले आहे व चारही ठिकाणी केलेल्या रस्त्याचे बांधकामाचे आता पावेतो अंदाजे 2 लाख रूपये जिएसटी, रिर्टन, सिक्युरीटी कटणी होवुन अंदाजे 16 लाख रूपये मला मिळाले आहे. त्यापैकी उर्वरीत अंदाजे 22 लाख रूपयाच्या बिलाचे मोजपुस्तीका (एमबी) जिल्हा परिशद, उप बांधकाम विभाग, धानोरा येथील कार्यालयातुन मिळणे बाकी असल्याने, मी उप बांधकाम विभाग, धानोरा येथील ज्युनियर इंजीनियर अक्षय अगळे यांना भेटुन वारंवार विचारणा केली असता, ते बिलाची एमबी देण्यास टाळाटाळ करीत होते.

दिनांक 14/06/2024 रोजी मी गडचिरोली बसस्टॉप जवळ असतांना उप बांधकाम विभाग, धानोरा येथील ज्युनियर इंजीनियर अक्षय अगळे साहेब भेटले, तेव्हा मी त्यांना माझे वरील नमुद केलेल्या रस्त्याचे बांधकामाचे उर्वरीत 22 लाख रूपयाचे बिलाचे एमबी बाबत विचारणा केली असता, त्यांनी मला ''दोन तिन दिवस सुटटी आहे, तुला मी नंतर फोन करतो'' असे म्हणाले होते.

दिनांक 19/06/2024 रोजी मी गडचिरोली येथे हजर असतांना सकाळी 10.42 वाजता दरम्यान माझे मोबाईल क्र. 9422494232 वर मो.क्र. 7020065294 नी उप बांधकाम विभाग, धानोरा येथील ज्युनियर इंजीनियर अक्षय अगळे यांचा फोन आला व त्यांनी मला ''मी बांधकामाचे एमबी देण्याकरीता 3 टक्के प्रमाणे पैसे घेतो, परंतु तु मला रस्त्यांचे केलेल्या कामाचे एमबी करीता 1,70,000/- रू. दे, नाही तर तुला रस्ते बांधकामची एमबी मिळणार नाही.'' असे बोलुन फोन बंद केले. त्यानंतर मी परत दोन वेळा फोनव्दारे ज्युनियर इंजीनियर अक्षय



Scanned with OKEN Scanner

पोलीस स्टेशन, धानोरा जि. गडचिरोली



अगळे यांना संपर्क करून एमबी देण्याबाबत विनंती केली, परंतु त्यांनी मला ''मगाशी जेवढे सांगीतले होते, तेवढे कर'' असे म्हणुन पैशाची मागणी केली व फोन केल्यानंतर गडचिरोली येथील कॉम्पलेक्सच्या टि पाईन्टला येवुन भेट''असे म्हणाले.ज्युनियर इंजीनियर अक्षय अगळे, जिल्हा परिशद, उप बांधकाम विभाग धानोरा ता. धानोरा जि. गडचिरोली यांनी मौजा बोधनखेडा पोचमार्ग, तुमडीकसा-हिरंगे, रेंगेगांव-गोटाटोला, मुरूमगांव-रिडवाही येथील रस्त्याची सुधारणा केलेल्या कामाचे एमबी देण्याकरीता 1,70,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली आहे. ज्युनियर इंजीनियर अक्षय अगळे, जिल्हा परिषद, उप बांधकाम विभाग, धानोरा यांना 1,70,000/- रुपये लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो. तसेच माझे वर नमुद केलेल्या रस्त्याचे बांधकामाचे वर्क आर्डर व जि. प. गडचिरोली येथील बांधकाम लाईसन्सचे झेरॉक्स प्रत सोबत जोडुन दिले आहे.ज्युनियर इंजीनियर अक्षय अगळे, जिल्हा परिशद, उप बांधकाम विभाग धानोरा ता. धानोरा जि. गडचिरोली यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुष्मनी नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचेविरुध्द कायदेषिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे.

त्यानंतर श्री.श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी दोन शासकिय पंचांना पाचारण करुन त्यांची व माझी ओळख करून दिली. श्री श्रीधर भोसले साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी स्वहस्ताक्षरात दिलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिले. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री श्रीधर भोसले यांनी सुद्धा स्वाक्षरी केली. त्यानंतर माझी अंगझडती घेतली व पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरून पोशी संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कशाप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यादरम्यान वेळ 16.49 वाजता सुमाराम माझे मोबाईल क्र. 9422494232 वर गैरअर्जदार अक्षय अगळे यांनी मो.क्र. 7020065294 नी फोन करून गडचिरोली येथील कॉम्पलेक्स टी पाईन्टला लाच रक्कम घेवुन बोलाविले.त्यानंतर लगेच पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सागुन सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना देत असतांना, वेळ 17.33 वाजता माझे मोबाईल क्र. 9422494232 वर गैरअर्जदार अक्षय अगळे यांनी मो.क्र. 7020065294 नी परत फोन करून गडचिरोली येथील कॉम्पलेक्स टी पाईन्टला लाच रक्कम लवकर घेवुन येण्यास सांगीतल्याने, व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन वेळ 17.38 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानला लटकवून ठेवून, मला पंच क्रं. 1 श्री. मोअतशींम शेख यांचेसह गडचिरोली येथील कॉम्पलेक्स टी पाईन्ट येथे माझे दुचाकी वाहनाने रवाना झालो..तेव्हा गैरअर्जदार ज्युनियर इंजीनियर अक्षय अगळे हे गडचिरोली येथील कॉम्पलेक्स टी पाईन्टला हजर मिळुन आले. व त्यांनी मला, पंचास त्याठिकाणी असलेल्या चायनिज स्टॉलच्या समोर घेवुन गेले व त्याठिकाणी माझे सोबत मौजा बोधीनखेडा पोचमार्ग, तुमडीकसा हिरंगे, रेगेगाय- गोटाटोला, मुरूमगाव- रिडवाही येथील रस्त्याचे सुधारणा करण्याचे कामाचे एमबी मिळण्यासंबंधाने बोलणी करतांना गै.अ. यांनी मी तर बोललो होतो, तुम्ही अडजेस्ट करा, तुमच्या ईच्छेने दया, असे म्हणून आता किती आणले असे म्हणून 1,70,000/-रू. लाच रक्कमेची मागणी करून स्विकरण्याची तयारी दर्शवीली, परंतु माझ्याकडे 1,70,000 रू. नसल्याने व पैसे अडजेस्ट होत नसल्याने उद्याला करतो असे म्हणालो असता गै.अ. यांनी ''ठिक आहे. उद्याला करा'' असे म्हणाले, तेव्हा मी गै.अ. यास '' तुम्ही 1,70,000/-रू. म्हणाले मी बहुत तंगीमध्ये आहे, जेवढे होईल तेवढे चालेल का, असे बोललो असता, गै.अ. यांनी ''ठिक आहे, पण नंतर उर्वरीत रक्कम कराल ना'' असे बोलून लाच रक्कम.स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह नियोजीत ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद केले व नंतर माझी अंगझडती घेतली.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भासले साहेब यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण ऐकुन व पंच क्र.1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून अक्षय अगळे, ज्युनियर इंजीनियर यांनी कामासंबधी बोलणी करून 1,70,000 रू. ची मागणी करून ''तुमच्या इच्छेने दया, आता किती आणले'' असे बोलुन लाच रक्कम 1,70,000 रू. उद्याला करा असे म्हणुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून गैरअर्जदार अक्षय अगळे यांचे विरुध्द उद्या दिनांक 20/06/2024 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. याबाबत सविस्तर नोंद पंचनामा क्र. 1 मध्ये नमुद आहे.

दिनांक 20/06/2024 रोजी सापळा कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांनी

Scanned with OKEN Scanner

पोलीस स्टेशन, धानोरा
जि. गडचिरोली



दिलेल्या सुचनप्रमाणे मी व दोन्ही शासकीय पंच असे लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथे सापळा कार्यवाही करीता हजर आलोत. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.श्रीधर भोसले साहेब यांचेकडे सापळा कारवाई करीता पैशाची जुळवाजुळव करून लाच रक्कम रू. 50,000/- (रू. 500/- दराच्या 100 चलनी नोटा) हजर केले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म सांगीतले. नंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रॅसिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. त्यानंतर सदर रक्कम एका लिफाप्यात ठेवले. त्यानंतर वेळ 14.44 वाजता दरम्यान माझे मोबाईल क्र. 9422494232 वर गैरअर्जदार अक्षय अगळे यांनी मो.क्र. 7020065294 नी फोन करून, ''मी कामामध्ये असून रात्री 09.00 वा. ते 10.00 वा. दरम्यान गडचिरोली येथील कॉम्प्लेक्सच्या टी पॉईंट येथे फोन केल्यानंतर पैसे घेवून ये, जर मी फोन नाही केला तर उद्याला आपण भेटू'' असे बोलले. त्यानंतर मी दोन्ही पंचासमक्ष श्री. भोसले साहेबांना ही वरील नमुद बाब सांगितली. त्यानंतर गै.अ. यांच्या फोनची वाट पाहत ला.प्र. विभाग, गडचिरोली येथेच थांबून होतो. परंतु गै.अ. यांचा फोन न आल्याने, गैरअर्जदार यांचा फोन आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याकरीता सापळा कार्यवाही स्थगित ठेवली. याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 2 मध्ये नमुद आहे. यानंतर गै.अ. अक्षय अगळे यांनी मला दि.26/06/2024 रोजी 17.05 वा. सुमारास फोन करून जिल्हा परिषद गडचिरोली येथून एमबी घेवून उप बांधकाम विभाग धानोरा कार्यालय येथे उद्याला येवून भेटा असे सांगितल्याने दि. 27.06.2024 रोजी मी ला.प्र.वि.गडचिरोली येथे जावून श्री.श्रीधर भोसले साहेबांना भेटुन वरील नमुद बाब सांगीतले, त्यावरुन भोसले साहेब यांनी सापळ्याचे आयोजन करून मला माझे दुचाकी वाहनाने धानोरा गावाचे अलीकडे थांबण्याची सुचना देवून रवाना केले. त्यानुसार मी धानोरा गावाचे अलीकडे थांबून व त्यांचे सापळा पथकाची वाट पाहत तिथे थांबून राहिलो. त्यानंतर थोडयाच वेळात पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले हे त्यांचे पथकासह तिथे हजर आले.

त्यानंतर माझी अंगझडती घेतली व रू. 50,000/-लाच रक्कम असलेला सिलबंद लिफापा फाडून त्यातील नमुद लाच रक्कम माझे फुलपॅन्टच्या डाव्या बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन गै.अ. अक्षय अगळे यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर बाहेर दर्शनी भागी येवून डोक्यावर हात फिरवून लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारण्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 सह माझे स्वतःचे दुचाकी वाहनाने उप बांधकाम विभाग धानोरा कार्यालय येथे लाच रक्कम देण्याकरीता रवाना झालोत. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटागटाने माझे मागोमाग आले. मी उप बांधकाम विभाग येथे गेलो असता, त्याठिकाणी गै.अ. श्री. अक्षय अगळे हे हजर मिळुन

========================
BUILD OUTPUT DESCRIPTION
========================

आले. व त्यांनी ''कामासंबंधी बोलणी करुन पहीले पेक्षा जास्त बारीक दिसत आहे'' असे बोलुन संशयाच्या नजरेने मला हात लावुन चेक केले व नंतर एकदाच कराल 'असे म्हणुन लाच रक्कम घेण्याची तयार दर्शवील्याने मी पंच क्रं. 1 सह नियोजीत ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर माझी अंगझडती घेतली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री भोसले यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत.

श्री.श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी दि. 28/06/2024 रोजी सापळयाचे आयोजन करून गै.अ. यांनी मला फोन करून बोलाविणार असल्याने गै.अ. यांची फोनची वाट पाहत ला.प्र.वि.गडचिरोली येथे थांबून होतो परंतु गै.अ. यांचा फोन न आल्याने त्या दिवशीची कार्यवाही स्थगित ठेवली व मला गै.अ. यांचा फोन किंवा बोलावणी होईल त्यावेळी सापळा कार्यवाहीकरीता हजर येण्याचे सुचना दिल्या.याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री भोसले यांनी पंचनामा क्रं. 4 मध्ये घेतल्या आहेत.

दि.31/07/2024 रोजी पर्यंत गै.अ. यांचा मला फोन न आल्याने तसेच गै.अ. यांनी मला एम.बी न दिल्याने मला पैशाची अडचण असल्याने पुढील कारवाई करीता मी ला. प्र.वि. गडचिरोली येथे हजर आलो व याबाबत मी

Scanned with OKEN Scanner

पोलीस निरीक्षक भोसले साहेब यांना गै.अ. यांचेविरुध्द पुढील कारवाई करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे श्री. भोसले साहेब यांनी दोन शासकीय पंचाना बोलावून घेतले. व सापळयाचे आयोजन करून मला माझे दुचाकी वाहनाने धानोरा गावाचे अलीकडे थांबण्याची सुचना देवून मला रवाना केले. त्यानुसार मी धानोरा गावाचे अलीकडे थांबून सापळा पथकाची वाट पाहत थांबून राहिलो.
त्यानंतर थोडयाच वेळात पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले हे त्यांचे पथकासह तिथे हजर आले. गै.अ. श्री. अक्षय अगळे हे उप बांधकाम विभाग धानोरा कार्यालयात हजर आहे किंवा कसे याची खात्री करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. भोसले साहेबांनी सापळा पार्टीतील सदस्य पोशि संदिप घोरमोडे यांना खात्री करण्याकरीता उप बांधकाम विभाग धानोरा येथे पाठवून माहिती काढली असता असे समजले की, गै.अ. अक्षय अगळे हे कार्यालयात हजर नसून ते उद्याला जिल्हा परिषद गडचिरोली येथे मिटींग करीता हजर राहणार आहे. त्यामुळे सापळा कार्यवाही स्थगित ठेवली.
आज दि. 01/08/2024 रोजी सापळा कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी व दोन्ही शासकीय पंच असे लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथे सापळा कार्यवाही करीता हजर आलोत. त्यावेळी मला माहिती मिळाली की, जिल्हा परिशद गडचिरोली येथील मिटींग रदद झाली असुन धानोरा येथील पंचायत समीती येथे मिटींग असल्याची माहिती मिळाल्याने नमुद बाब भोसले साहेबांना सांगीतले, त्यावरून भोसले साहेब यांनी सापळयाचे आयोजन करून मला माझे दुचाकी वाहनाने धानोरा गावाचे अलीकडे थांबण्याची सुचना देवून रवाना केले. त्यानुसार मी धानोरा गावाचे अलीकडे थांबून सापळा पथकाची वाट पाहत राहिलो. त्यानतर थोडयाच वेळात पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले हे त्यांचे पथकासह तिथे हजर आले. त्यानंतर माझी अंगझडती घेतली व रू. 50,000/-लाच रक्कम असलेला सिलबंद लिफापा फाडून त्यातील नमुद लाच रक्कन माझे फुलपॅन्टच्या डाव्या बाजुचे खिश्यात ठेवले. त्यानंतर सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन गै.अ. अक्षय अगळे यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर बाहेर दर्शनी भागी येवून डोक्यावर हात फिरवून लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारण्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.
पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 सह माझे स्वतःचे दुचाकी वाहनाने पंचायत समीती कार्यालय धानोरा येथे मिटींग असलेल्या ठिकाणी लाच रक्कम देण्याकरीता रवाना झालोत. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटागटाने माझे मागोमाग आले. मी पंचायत समीती धानोरा येथे गेलो असता, पंचायत समीती धानोरा येथील मिटींग हॉलचे बाहेर गै.अ. श्री. अक्षय अगळे हे हजर मिळुन आले. व त्यांनी ''मिटींग आहे, अर्धा एक तास थांब, असे बोलल्याने मी व पंच क्र.1 असे दोघेही आपण थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलोत. त्यानंतर लाच रक्कन मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले.
त्यानंतर परत काही वेळाने पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 सह माझे स्वतःचे दुचाकी वाहनाने पंचायत समीती कार्यालय धानोरा येथे मिटींग असलेल्या ठिकाणी लाच रक्कम देण्याकरीता रवाना झालोत. त्यावेळी गै.अ. अक्षय आगळे हे मला ग्रामीण रूग्णलय धानोरा जवळील चाय टपरीवर मिळुन आले व त्यांनी मला '' मिटींग झाल्याने बाहेर आलो आहे, तुमच्या एमब्या झाल्या आहे'' असे बोलुन आधिक बोलण्यास टाळाटाळ करून निघुन गेल्याने, मी पंच क्रं. 1 सह नियोजीत ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष माझी अंगझडती घेवुन व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणा ऐकुन व पंच क्र. 1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून तसेच दिनांक 19/06/2024, दिनांक 27/06/2024 व दिनांक 01/08/2024 रोजी असे तिन वेळा लाच रक्कम देण्याकरीता गेलो असता, श्री. अक्षय अगळे यांना कोणत्यातरी कारणास्तव संशय आल्याने ते माझे कडुन पैसे घेतले नाही व यापुढे माझे कडुन पैसे घेणार नाही असे मला वाटत असल्याने निवेदन सादर केल्याने गै.अ. अक्षय अगळे यांना श्रीधर भोसले साहेबानी ताब्यात घेतले. त्यानंतर कामासंबधीचे कागदपत्र ,मेमोरी कार्ड व मोबाईल जप्त करण्यात आले.याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री भोसले यांनी पंचनामा क्रं. 6 मध्ये घेतल्या आहेत.

Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

तरी दिनांक 19/06/2024 व दिनांक 27/06/2024 रोजी झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान श्री.अक्षय मनोहर अगळे, वय 29 वर्षे, पद- कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग धानोरा ता. धानोरा जि. गडचिरोली यांनी माझे सन 2023-2024 मधील मौजा रेंगेगांव-गोटाटोला व मौजा मुरूमगांव-रिडवाही रस्त्याची सुधारणा करणे तसेच दंडकारण्य मजुर सहकारी संस्था मर्या. गटटा ता. धानोरा जि. गडचिरोली यांचे नावे असलेले मौजा बोधनखेडा पोच मार्गाची सुधारणा करणे व प्रभुकमल मजुर सहकारी संस्था मर्या. मु.पो. दुधमाळा ता. धानोरा जि. गडचिरोली यांचे नावे मौजा तुमडीकसा हिरंगे रस्त्याची सुधारणा करण्याचे कामे पुर्ण केल्यानंतर त्या कामाची एमबी देण्या करीता 1,70,000/- रू. लाच रक्कमेची मागणी केल्याने त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SWAPNIL DHONDIRAM DHULE(I (Inspector)) / PNMH51007 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SWAPNIL DHONDIRA
**Rank(पद):** I
**No.(सं.):** PNMH51007

Scanned with OKEN Scanner

पोलीस स्टेशन, धानोरा
जि. गडचिरोली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

Scanned with OKEN Scanner